आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक सातवा पृष्ठे १०
जुलै २०२२
www.parlekar.com
Registered-RNI no. 54781/92

या अंकात
पान ०२ डॉ. पद्माकर म्हस्कर - पार्ल्याचे किमयागार आद्य फिजिओथेरपिस्ट
पान ०५ सायबेरियाची राजकन्या
पान ०६ कथा मनातल्या जनातल्या
पान ०७ नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला तेजपाल मार्ग उपाख्य वि.स.खाडेकर मार्ग
पान ८ कलासक्त सूर श्रीमती गौरी पाठारे



# लोकमान्य सेवा संघाची शतक महोत्सवी वर्षातील निवडणूक

आपल्या सर्वांच्या आयुष्यात एक गोष्ट सातत्याने होत असते आणि ती म्हणजेच 'बदल' हा बदल आपण स्वीकारला पाहिजे आणि सर्वांबरोबर पुढे जायला पाहिजे. माहिती आणि तंत्रज्ञानात हा बदल खूपच वेगाने होत आहे. अशा वेळी आपण सुद्धा मागे राहता कामा नये, असा विचार करून लोकमान्य सेवा संघाची शतक महोत्सवी वर्षातील निवडणूक संगणकाद्वारे घेण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी दि. २६ जून रोजी ही निवडणूक सकाळी १० ते संध्याकाळी ४.३० ह्या वेळेत झाली आणि निवडणुकीची मतमोजणी अवघ्या २० मिनिटात पूर्ण झाली.

संगणकाद्वारे निवडणूक घेण्यासाठी संघाच्या माहिती तंत्रज्ञान शाखेचे कार्यवाह श्री. शरद बागुल आणि निवडणूक अधिकारी श्री. विनय म्हसकर ह्यांनी विशेष मेहनत घेतली. संगणकावर मतदान करण्यासाठी स्क्रीन वर सर्व उमेदवारांची नांवे होती आणि त्यामधून १२ जणांची निवड करावयाची होती. ज्या उमेदवारास मत द्यायचे त्याच्या नावावर किंवा नावाच्या बाजूला क्लिक करून आपले मत नोंदवून कमाल १२ मते देण्याची मुभा होती. मतदाराला आपण दिलेली मते बरोबर आहेत याची खात्री करून मगच मतपत्रिका प्रिंट करावयाची आज्ञा स्क्रीन वर होती. मतपत्रिका प्रिंट करावयाच्या आधी मतदाराला आपले मत बदलावयाचा पर्याय देण्यात आला होता. सरतेशेवटी मतपत्रिका प्रिंट झाली की ती मतपत्रिका घेवून स्क्रीनवर तपासण्याची सोय होती. अशा पारदर्शक प्रक्रियेमुळे कोणतेही मत अवैध ठरले नाही, शिवाय मतमोजणी वेगाने झाली आणि सदस्यांच्या वेळेचा अपव्यय टाळता आला.

**संघाच्या नव्या कार्यकारणीत खालील १६ सदस्य आहेत:**

**कार्याध्यक्ष -** श्री. उदय तारदाळकर

**कार्योपाध्यक्ष-** श्री आलोक हर्डीकर

**कोषाध्यक्ष -** श्री. महादेव भिडे

**संघकार्यवाह -** श्री. महेश काळे

**संघकार्यवाह-** डॉ. रश्मी फडणवीस

सदस्य : विवेक आचार्य, मुकुंद फाटक, अतुल गोखले, अरुण सोहोनी, लोकेश तारदाळकर, सुजित वायंगणकर, लीना बर्वे, प्रीती पटवर्धन, संगीता साने, मृदुला दातार, जुई बाग.





## संपादकीय

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच पार्ले गाव वसायला सुरवात झाली होती पण १९०७ साली विलेपार्ले स्थानक बांधण्यात आले आणि गावातील वस्ती वाढू लागली. पहिल्यापासून राहणाऱ्या ख्रिश्चन व कोळी समाजाबरोबरच आता मराठी चाकरमानी मंडळी सुद्धा येथे राहू लागली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर लगेचच त्यांच्या प्रेरणेने पार्ल्यात पार्ले टिळक विद्यालय व लोकमान्य सेवा संघ ह्या संस्था उभ्या राहिल्या आणि खऱ्या अर्थाने येथील रहिवाश्यांचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक सहजीवन सुरु झाले. त्यानंतरच्या काही वर्षात पार्ल्यात अनेक संस्था उभ्या राहिल्या आणि ह्या सर्वांनी आपापल्या परीने, आपापल्या कुवतीनुसार पार्ल्याच्या परंपरेत भर घातली, अजूनही घालत आहेत.

त्यावेळच्या समाजधुरीणांनी काळाची गरज ओळखून त्याच प्रमाणे भविष्याचा कानोसा घेऊन आपल्या कार्यक्रमांची, उपक्रमांची आखणी केली होती व त्यामुळेच आजचा सशक्त, जागरूक व बुद्धिजीवी समाज तयार झाला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज काळ बदलला आहे, जगणे जास्त संघर्षमय झाले आहे, तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे, तरुणांचे भावविश्व, प्रतीके, आदर्श, सर्व काही बदलले आहे पण पार्ल्यातील संस्था मात्र पाहिजे तेवढ्या बदलल्या नाहीत असे खेदाने म्हणावे लागते. पूर्वापार चालत आलेले कार्यक्रम करण्यातच धन्यता मानली तर कसा येणार तरुण तुमच्याकडे ? संस्थेत तरुण येत नाहीत हा त्यांचा दोष नसून आपले अपयश आहे ह्याची जाणीव आम्हाला कधी होणार ? आजच्या जीवनाशी निगडित विषयांवरील उपक्रम सुरु केल्यास, तरुणांना त्यांच्या करिअरमध्ये फायदा होईल अश्या विषयांवर कार्यक्रम केल्यास (व त्याची चांगली जाहिरात केल्यास) का नाही तरुणाई गर्दी करणार ? काळानुसार सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांची भूमिकासुद्धा बदलली पाहिजे हे केव्हा समजणार आम्हाला ? नुकतीच टिळक मंदिराची निवडणूक पार पडली असून नवीन कार्यकारी मंडळ अस्तित्वात आले आहे. मंदिराचे शतक महोत्सवी वर्ष सुरु आहे. नवीन टीम आपली जबाबदारी ओळखून, समाजाची, तरुणांची तसेच ज्येष्ठ नागरिकांची गरज लक्षात घेऊन, नाविन्यपूर्ण कार्यक्रम, उपक्रम आखतील अशी आशा करूया !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
रोहित जाधव
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# डॉ. पदमाकर म्हस्कर - पार्ल्याचे किमयागार आद्य फिजिओथेरपिस्ट

काही दिवसांपूर्वी शिवानंद सोसायटीत काही कामानिमित्त गेलो होतो. लांबूनच मला हातात काठी घेतलेले, थोडे वाकलेले परंतु उत्साहात चालणारे एक आजोबा दिसले. जवळ आल्यावर लक्षात आले की हे आपले म्हस्करकाका आहेत. 'काय राहुल कसा आहेस ?' अशी त्यांची हाक आली आणि अगदी समवयस्क असल्यासारख्या आमच्या गप्पा सुरू झाल्या. वीस एक वर्षांपूर्वी खांद्याच्या दुखापतीमुळे मी त्यांच्या क्लिनिकमध्ये जात असे. 'काही काळजी करू नकोस, लवकर बरा होशील' अशा त्यांच्या आश्वासक शब्दांनी माझी काळजी दूर झाली. सलग २ आठवडे माझी ट्रीटमेंट सुरु होती. व्यायाम आणि diathermy घेता घेता आमच्या गप्पा रंगत. त्या गप्पामधून मला



त्यांच्या physiotherapy च्या प्रवासाचा उलगडा झाला. त्यांचे अनेक पैलू समजले. खूप गप्पिष्ट, विनोदी, कामात अगदी निष्णात, व्यायाम करून घेताना कठोर पण दुखले का रे असे विचारताना तेवढेच मृदु, संगीताची प्रचंड आवड असलेलं असं व्यक्तिमत्त्व समोर आलं.

ज्या काळात फिजिओथेरपीबद्दल जनमानसात प्रचंड उदासीनता होती तेव्हा profession म्हणून या अभ्यासक्रमाची निवड करायची हेच मुळी एक आव्हान होते. १९५७ साली K.E.M. मधील Physiotherapy च्या दुसऱ्या बॅचमध्ये admission घेऊन अभ्यासक्रम 2nd Rankने पूर्ण केला. अमळनेरहून आल्यामुळे मुंबईत आधार व ओळख अजिबात नव्हती. तरीही खचून न जाता ट्रेन व स्कुटरने मुंबईभर फिरून visits केल्या. Poliomyelitis, slipped disc, fractures नंतरची contractures, knee joint replacement नंतरचे व्यायाम असे सर्व प्रकारचे पेशंट्स त्यांनी संपूर्णपणे बरे केले. पेशंटच्या गरजेनुसार त्याला वेळ देत असत. अगदी २ आणि ३ रु. इतकी कमी फी घेऊन ते काम करत असत. बोरिवली, कांदिवली, गोरेगाव येथील धर्मार्थ दवाखान्यांमध्ये , ते देतील त्या मानधनामध्ये त्यांनी यशस्वीपणे physiotherapy department चालवले. त्या काळीसुद्धा कमीत कमी २५-३० पेशंट्स प्रत्येक O.P.D ला असत ते केवळ डॉ. म्हस्कर आपल्याला नक्की बरे करतील या विश्वासामुळेच.

त्यांचे नाव सर्वत्र होत होते व कामही वाढत होतेच. १९७२ साली त्यांनी पार्ल्याला स्वत:चे क्लिनिक सुरू केले. तिथेही २५-३० पेशंट्स रोज येत. पेशंट्सचा वाढता ओघ पाहून त्यांच्या पत्नी सौ. सुधा म्हस्कर याही त्यांच्या मदतीसाठी नियमीतपणे क्लिनीकमध्ये जाऊ लागल्या. अत्यल्प वेळात त्यांनी ट्रीटमेंट्स देण्याच्या सुयोग्य पध्दती आत्मसात केल्या. त्यांच्या छोटेखानी क्लिनिकमध्ये traction, diathermy, Wax bath, TNS , Stimulation अशा अनेक सोयी त्यांनी उपलब्ध केल्या होत्या. एकाच वेळी ते निरनिराळ्या therapy चे ३-४ पेशंट्स सहज handle करत असत. गप्पा, विनोद सुरुच असत. स्वत:ला चहा मागवताना Patients साठी पण cutting चहा मागवायला ते विसरत नसत. श्री. रमेश देव, श्री. विक्रम गोखले आणि अशा अनेक दिग्गजांनी त्यांचे नाव ऐकून क्लिनिकमध्ये येऊन Physiotherapy घेतली आहे. श्रीमती सुधा चंद्रन यांना जेव्हा अपघात झाला तेव्हा त्यांचे वडील पार खचून गेले होते. तुमची मुलगी Jaipur foot घालून नक्की नाचू शकेल असे म्हस्कर काकांनी आश्वासन दिले. Dance steps समजून घेऊन, artificial foot घालून त्या कशा करता येतील याचा अभ्यासपूर्वक विचार करून ते जवळजवळ वर्षभर त्यांच्या घरी जाऊन त्यांना training देत होते. सोसायटीतील अनेक जण, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र यांच्याकडून, त्यांनी कधीही पैसे घेतले नाहीत. सल्ला देण्यासाठी त्यांचं दार सर्वांसाठी सदैव उघडं होतं आणि आजही आहे.

K.E.M. Hospital चे एक प्रतिथयश बालरोग तज्ञ डॉ. मिलिंद टुल्लु यांच्या आई सौ. वैजयंती टुल्लु यांनी म्हस्कर डॉक्टरांबद्दलचा अभिप्राय लिहूनच पाठवला. त्या म्हणतात, ''माझा मुलगा मिलिंद ९-१० महिन्यांचा असताना (म्हणजे १९७५ साली) त्याला पोलिओ झाला. मोठ्या आशेने मी सांताक्रुजहून डॉ. म्हस्करांकडे घेऊन आले. त्यांचा हसतमुख चेहरा व प्रसन्न व्यक्तिमत्त्व पाहूनच मला एक दिलासा वाटला. Stimulation व व्यायाम द्यावा लागेल असे त्यांनी सांगितले. मी नियमितपणे १ १/२ ते २ वर्षे, क्लिनिकमध्ये येत होते. व्यायाम देताना मिलिंद रडू नये म्हणून ते त्याच्याशी गप्पा मारत रहायचे व नंतर १ पार्ले जी पण दयायचे. त्यांच्या treatment देण्याच्या कौशल्यामुळे मिलिंद स्वत:च्या पायावर उभा राहिला व caliper शिवाय चालायला लागला.''

लवकरच म्हणजे १९ जुलैला ते ८८ वर्षांचे होणार आहेत. आजही ते चिरतरुण आहेत, फिजिओथेरपीचे व्यायाम रोज करून अगदी फिट आहेत आणि त्यांच्या व्यवसायावर अजूनही त्यांचे नि:स्सिम प्रेम आहे. त्यामुळेच आजही कोणी फिजिओथेरपीनिगडित सल्ला घ्यायला आले तर त्यांचा चेहरा उजळतो व अगदी तरुणपणीच्या उत्साहात ते सल्ला देतात आणि व्यायाम करून दाखवायला कमी करत नाहीत.

माझ्या या डॉक्टर काकांसाठी जीवेत् शरद: शतम् । अशी देवाकडे प्रार्थना करतो.

**राहुल बागुल**
rbagool@gmail.com

GOLDEN GATE TO IIT
*"Making your dreams come true since 2005"*

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals:** Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice:** Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development:** Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch | Our Top Scorers : 2019 Batch



Abhishek Mungekar IIT Gandhinagar | Anokhi Mehta IIT Bombay | Mihir Dharap IIT Palakkad | Shreyas Nadkarni IIT Bombay | Om Prabhu IIT Bombay | Atharva Varde IIT Guwahati | Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty



Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay | Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay | Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy | Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay | Prof. Tarun Ahirwar B.Tech ISM Dhanbad
Mathematics | Physics | Chemistry

Contact: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
Address: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

# किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (KVPY)

**Science विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी**

'किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना' (KVPY) भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने १९९९ मध्ये सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश संशोधनासाठी प्रतिभा आणि योग्यता असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखणे, प्रोत्साहित करणे आणि त्यांना मूलभूत विज्ञानातील (बेसिक सायन्सेसमधील) संशोधनात करिअर करण्यासाठी सक्षम करणे आहे.

'किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना' (KVPY) हा भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाद्वारे (Department of Science and Technology, DST) सुरू करण्यात आलेला राष्ट्रीय कार्यक्रम असून त्याच्या आयोजनाची आणि अंमलबजावणीची जबाबदारी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरूकडे आहे.

**या परीक्षेला कोण बसू शकतात ?**

विज्ञान शाखेच्या ११ वी चे विद्यार्थी, बारावीचे विद्यार्थी आणि प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाचे (B.Sc) विद्यार्थी या परीक्षेला बसू शकतात. (अर्थातच यांच्या प्रश्नपत्रिका वेगवेगळ्या असतात.)

KVPY फेलोशिपची जाहिरात सर्व राष्ट्रीय दैनिकांमध्ये साधारणपणे दरवर्षी तंत्रज्ञान दिन (११ मे) आणि जुलैच्या दुसऱ्या रविवारी दिली जाते.

पात्रता निकष इयत्ता अकरावीची परीक्षा (ज्याला KVPY Stream SA म्हणतात) : ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावी (विज्ञान विषय) शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये प्रवेश घेतला आहे.

इ. बारावीची परीक्षा ( ज्याला KVPY Stream SX म्हणतात) : ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी (विज्ञान विषय) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेश घेतला आहे.

**परीक्षेचे स्वरूप :**

पहिला टप्पा (अभियोग्यता चाचणी): KVPY अभियोग्यता चाचणी मध्ये एकूण १०० गुणांचे वस्तुनिष्ठ प्रकारचे प्रश्न असतात.

अ) विद्यार्थी जर ११ वी त असताना त्याला KVPY द्यावयाची असल्यास भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या चारही विषयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. (सर्व प्रश्न अनिवार्य आहेत).

ब) विद्यार्थी जर १२ वी त असताना त्याला KVPY द्यावयाची असल्यास भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या चार विषयांपैकी तीनच विषयांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या परीक्षेच्या भाग एक व दोनमध्ये प्रत्येकी चार विभाग (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित) असतात.

त्यापैकी विद्यार्थ्यांना भाग एक मधील चारपैकी कोणत्याही तीन विषयांची आणि भाग दोन मधील चारपैकी कोणत्याही दोन विषयांची उत्तरे देण्याची मुभा आहे. म्हणून 12 वी त असतांना त्याला KVPY देणे सोपे जाते.

दुसरा टप्पा (मुलाखत): अभियोग्यता चाचणी मध्ये अव्वल गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांनाच मुलाखतीसाठी बोलावले जाते.

शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी, अभियोग्यता चाचणी आणि मुलाखतीचे गुण दोन्ही विचारात घेतले जातात.

शिष्यवृत्ती व अनुदान

1) F.Y.B.Sc ते T.Y.B.Sc दरम्यान म्हणजेच विद्यार्थी B.Sc. किंवा M.Sc. होईपर्यंत मासिक ५०००,आणि

2) वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य इ. खरेदीसाठी दर वर्षी २०,०००

डॉ. यु. आर. कापडी

Golden Gate to IIT

अधिक माहीतीसाठा : Whatsapp संपर्क दुपारी १२ ते ४ पर्यंत (०९८६७२४४९१)



श्री. सुरेश रामचंद्र बर्वे यांना अल्पशा आजाराने २१ जून २०२२ रोजी देवाज्ञा झाली. व्यवसायाने आर्किटेक्ट असलेल्या श्री सुरेश बर्वे यांनी अंधेरी M.I.D.C येथे शंभरहून अधिक इंडस्ट्रीयल इमारती बांधल्या. भारताबाहेर ही त्यांनी प्रोजेक्ट्स केली जसे की भूतान येथील SAARC Convocation Center .तसेच स्वत:ची रहाती वास्तु 'मंगलमूर्ती' ना नफा ना तोटा या तत्वावर self redevelopment केलेली एकमेव वास्तु असावी.

वडील कै रामभाऊ बर्वे यांचा वारसा जपत विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघ, स्वा. सावरकर सेवा केंद्र, प्रबोधनकार ठाकरे संकुल येथे महत्वपूर्ण योगदान दिले. तसेच त्यांच्या वडीलांप्रमाणे विलेपार्ले पूर्व याच्या इतिहासाचा दुसरा खंड लिहिण्यात मोलाचे योगदान दिले.

८ जुलै २०१० रोजी स्वा. सावरकर यांच्या Marseilles येथील ऐतिहासिक उडीला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सावरकर प्रेमींना तेथे घेऊन जाऊन आदरांजली वाहिली. त्यांच्या उदार, दिलदार स्वभावामुळे त्यांनी अनेक माणसं जोडली होती.

त्यांच्यामागे त्यांचे २ मुलगे, २ सूना व नातवंडे असा परिवार आहे.



# महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय


एकेकाळी रॉयल ऑफ्रेड सेलर्स होम म्हणून ओळखली जाणारी इमारत नंतर कौन्सिल हॉल म्हणूनही वापरात होती. मेंघम नावाच्या इंग्रजाचे प्रथम दफन झालेली हि भूमी नंतर इंग्रजांची दफनभूमी झाली. या भूमीवरच आजची ही इमारत उभी आहे. २७० फूट लांब व ५८ फूट रुंद अश्या प्रशस्त गॉथिक शैलीतल्या या इमारतीचे काम १८७६ साली पूर्ण झाले. त्याकाळी रुपये ३,७६,०००/ रोख खर्चून बांधलेल्या या इमारतीसाठी बडोदा नरेश खंडेराव गायकवाड यांनी दोन लाख रुपये दान म्हणून दिले आहेत.


प्रसिद्ध वास्तुविशारद फ्रेडरिक विल्यम्स स्टीफन्स यांनी वीस नौदल अधिकारी, शंभर खलाशी व अडचणीला काही इतर माणसांना राहण्याची व्यवस्था म्हणून या इमारतीचे डिझाईन केले. त्यामुळेच नेपच्यून या ग्रीक सागरी देवतेची शिल्पाकृती प्रवेशद्वारावर त्रिकोणात कोरलेली दिसते. कलत्या पाख्याची लाल रंगी छपरे आणि बांधकामात बहुरंगी पाषाणांचा केलेला कलापूर्ण वापर ही या वास्तूची वैशिष्ट्ये. दर्शनी भिंत लाव्हा पाषाण (बासाल्ट) असून तो गडद नीलवर्णी आहे. कोपरे, गोलाई हे खाकी (बफ) रंगातील पोरबंदर दगडांनी व त्यावरील नक्षी, कलाकुसर ही हेमनगर जातीच्या दगडांनी केली आहे. हे नक्षीकाम जे जे स्कूल ऑफ आर्टचे प्राचार्य जॉन लॉकवुड किपलिंग यांनी आपल्या विद्यार्थ्यांकडून करवून घेतले आहे. सर्व कमानीही हेमनगर दगडात असून काही ठिकाणी स्थानिक कुर्ला व लाव्हा (बासाल्ट) दगडांचे मिश्रण आहे. विविध जातीचे पाषाण, त्यांचे पोत, नैसर्गिक रंग यांचा कौशल्याने केलेला वापर यामुळे वास्तूचे देखणेपण इतके वाढते की तिचे लक्षवेधी सौंदर्य जाणकारांना थक्क करते.

जोसेफ कॉनरॅड या प्रख्यात लेखकाला त्याची प्रसिद्ध 'द निगर ऑफ नारसिस' ही कथा याच वास्तुत स्फुरली. पुढील काळात या सेलर्स होमच्या मागे कौन्सिल हॉल साठी इमारत बांधली गेली व या दोन्ही इमारतींना जोडणारी मार्गिकाही. कौन्सिल हॉलच्या दर्शनी भिंती पितरंगी (बफकलर) असून फरसबंदी रबर असबेस्टॉस टाइल्सने सजवली आहे. इथे वातानुकुलित यंत्रणाही बसवलेली असून अशी यंत्रणा बसवलेली ही पहिलीच इमारत होती. सन १९८० साली महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय या इमारतीत हलवण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीत नौदलाचा उठाव हा निर्णायक टप्पा ठरला व इंग्रज राज्यसत्ता उलथून टाकली गेली. इंग्रजांच्या दफनभूमीवरील नौदलासाठी बांधलेली ही इमारत आजच्या संरक्षणाचा भार उचलणाऱ्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलाला मिळाली हा योगायोग म्हणावा का नियतीचा न्याय ?

**संगीता बेहेरे**
**९८६७७५८३१०**
**(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)**





# सायबेरियाची राजकन्या

देशोदेशी

मी मंगोलियाला जाण्याचं मुख्य कारण होतं मला उलानबाटर मध्ये आगगाडी पकडायची होती सायबेरियाला जायला. सायबेरियापासून पश्चिमेला मॉस्को आणि पुढे सेंट पिटर्सबर्ग पर्यंतच्या ह्या प्रवासातील काही अनुभवांबद्दल (बुर्यातीया, तातरस्तान) मी आधीच लिहिलेलं कदाचित तुमच्या स्मरणात असेल. हा लेख आहे मुख्यत: इर्कुतस्क ह्या सायबेरियाच्या प्रमुख शहरातील एका असामान्य घरातील एका अविस्मरणीय अनुभवाबद्दल.



रशियन साम्राज्याने सायबेरियाची भूमी पादाक्रांत करायला सुरुवात केली सोळाव्या शतकाच्या शेवटी. पॅसिफिक महासागरापर्यंतचा हा अफाट प्रदेश रशियन साम्राज्याला जोडला गेल्यावर तिथे नांदणाऱ्या तातर, बुरयात,ओस्त्याक अशा मूळ रहिवाशांवर जरब बसविण्यासाठी ह्या जिंकलेल्या प्रदेशात ठिकठिकाणी सैन्याची ठाणी उभारली गेली. १७व्या शतकाच्या मध्यावर, अंगारा नदीच्या किनाऱ्यावर याकोव्ह पोखाबोव्ह नावाच्या रशियन अधिकाऱ्याने बांधलेला इर्कुतस्कचा किल्ला हे त्यातील एक प्रमुख ठाणं. पहिला फोटो - पोखाबोव्हच्या आजच्या इर्कुतस्कमधील स्मारकाचा.

तत्कालीन रशियाच्या राजवटीला कराच्या रूपाने लूट करण्यावाचून सायबेरियाशी इतर काही देणं-घेणं नव्हतं. त्यामुळे इर्कुतस्कच्या स्थापनेचा मूळ उद्देशही स्थानिक जनतेला करवसुलीसाठी पिळून काढणं, आणि ह्या जुलुमजबरदस्तीला विरोध करणाऱ्यांना तुरुंगात खितपत ठेवणं असा होता. त्यामुळे कायमस्वरूपी सैनिकी ठाणं बांधण्याआधीच पहिलं पक्कं बांधकाम अंगारा नदीतील इर्कुत बेटावर केलं गेलं ते एका तुरुंगाचं!

पुढील कित्येक शतकं (अगदी कम्युनिस्ट राजवटीच्या अखेर पर्यंत) राज्यकर्त्यांच्या नावडत्या व्यक्तींना सक्तमजुरीत पिचत ठेवण्याची जागा म्हणून पूर्व सायबेरियाची जी दुष्कीर्ती (ज्याचं विदारक वर्णन सोल्झेनित्सेनच्या 'गुलाग आर्चिपेलागो' सारख्या पुस्तकात सापडतं) झाली त्याची सुरुवातच एका दृष्टीने इर्कुतस्कच्या स्थापनेपासून झाली असं म्हणता येईल.

'तडीपार कैद्यांची काळ-कोठडी'अशी सुरुवात झालेल्या ह्या नगरीची 'पूर्वेकडचे पॅरिस' असे परिवर्तन होण्याची सुरुवात झाली १९व्या शतकाच्या सुरुवातीला.

फ्रेंच राज्यक्रांतीने प्रभावित होऊन एक नवा उदारमतवाद त्याकाळी रशियामध्ये पसरू लागला होता. तत्कालीन झार अलेक्झांडरचे निकटवर्ती नातेवाईक आणि उमरावच ह्या नव्या मनूचा प्रसार करणाऱ्यांचे अग्रणी होते. त्यांनी `Union of Salvation' (मुक्ती संघ) नावाची संघटनाही स्थापन केली होती. परंतु अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर नव्या राजवटीत पारंपरिक एकाधिकारशाहीच पुढे चालणार, असं दिसल्यावर १८२५च्या डिसेंबर महिन्यात ह्या मुक्ती संघाच्या पुढाऱ्यांनी झारच्या विरुद्ध बंड पुकारलं. परंतु निव्वळ ध्येयवाद क्रांती घडवायला पुरेसा नसतो. झार निकोलसने मुक्ती संघटनेच्या अनुयायांची कत्तल करून त्यांच्या पुढाऱ्यांना सायबेरियात सक्त मजुरीसाठी पाठवून दिलं. त्यातील एक होता प्रिन्स सर्गी वोल्कोन्स्की - राजघराण्याचा जवळचा आप्त. त्याची पत्नी मारिया ही सुद्धा रशियाच्या सर्वात मानांकित सेनाधिपती राएवस्कीची मुलगी. ह्या फसलेल्या बंडाळीच्या केवळ एकच वर्ष आधी त्यांचं लग्न झालं होतं आणि त्यांना एक तान्हा मुलगाही होता.

एकवेळ थडग्यात पुरलेली व्यक्ती पुन्हा जीवंत होऊन वर आली असती पण एकदा सायबेरियात तडीपार झालेला मनुष्य धडधाकट परतून आलेला कोणी पाहिला नव्हता. तिकडे सर्गी इर्कुतस्कच्याही पूर्वेला चिता छावणीमध्ये चाबकाच्या फटक्याखाली दगड फोडत होता, आणि इकडे सेंट पिटर्सबर्गमध्ये मारिया झार निकोलस बरोबर झगडत होती, निदान स्वत:ला तरी सायबेरियाला जाऊन नवऱ्याला भेटण्याची परवानगी मिळविण्यासाठी. त्यासाठी तिने सर्व वाडवडिलार्जित संपत्ती आणि बिरुदांचा त्याग केला. शेवटी आपल्या बाळालाही बरोबर न नेण्याच्या अटीवर तिला इर्कुतस्कला जाण्याची परवानगी मिळाली.

एकटी, जवळ एक पैसाही नाही, वाटेत कोणीही तिला मदत करू नये असा सरकारी फतवा असताना, तिने हा ५७०० कि.मी. चा खडतर प्रवास कसा केला ह्याचं हृदयद्रावक वर्णन 'Princess of Siberia'ह्या पुस्तकात तुम्हाला सापडेल.

काय होतं सायबेरियात त्या काळात? जीवन-मरणाच्या सीमेवर कसं तरी जगण्याच्या प्रयत्नात हरणाऱ्या कंगाल शेतकऱ्यांची वस्ती, अश्मयुगीन किंवा कदाचित एखादंच पाऊल पुढे अशी, कुठल्याही प्रकारे संस्कृतीचा स्पर्शही नसलेली जीवनशैली, अनन्वित छळ सोसणाऱ्या कैद्यांच्या वसाहती. मारियाने पुढच्या २६ वर्षांत ह्या अंधकारात जगताना 'संस्कृती' सायबेरियात आणली. ज्यांना 'शिक्षण' म्हणजे काय हे माहित सुद्धा नव्हतं त्यांच्यासाठी शिक्षण आणलं. स्थानिक प्रशासनाबरोबर सतत झगडून, टीचभर अंधारकोठडीत खिचपत पडलेल्या कैद्यांना स्वत:च्या झोपड्या बांधून मोकळ्या आकाशाखाली राहण्याची सवलत मिळविली. तिने आपलं 'प्रिन्सेस' हे अधिकृत बिरुद सेंट पीटर्सबर्ग मधेच सोडून दिलं होतं पण स्थानिक जनतेने उत्स्फूर्तपणे तिला Princess of



Siberia म्हणायला सुरुवात केली. पण सर्वात महत्वाचं म्हणजे तिने ह्या वैराण प्रदेशात संगीत

पान ९ वर




# कथा मनातल्या जनातल्या

श्रीमती विद्या पेठे यांचा कथासंग्रह 'कथा मनातल्या जनातल्या' हातात येताक्षणी दोन गोष्टींनी लक्ष वेधले. त्यातील सात कथा त्यांच्या मनातल्या म्हणजे स्वतंत्र कथा आहेत आणि नऊ कथा जनातल्या म्हणजे प्रसिध्द ऐतिहासिक व्यक्तिच्या जीवनातील प्रसंगावर आधारित आहेत.

लक्ष वेधून घेणारी दुसरी गोष्ट म्हणजे मुखपृष्ठ लेखनात मग्न असलेली लेखिका, खिडकीतून दिसणारं कोकिळेच पोर आणि प्रसिध्द स्त्री व्यक्तिरेखांची चित्रं, ज्यांच्या चरित्रकथांचा पुस्तकात समावेश आहे. या उपर रंगसंगतीही आकर्षक आहे.

विद्याताईनी कथासंग्रह आपल्या आईवडिलांच्या स्मृतीला अर्पण केला आहे. त्यामागील पानावर, कथा वाचन, कथाकथन आणि अभिवाचन याबद्दल सुरेख विचार व्यक्त केले आहेत.



माधवी कुंटे यांनी कथासंग्रहाबद्दल उत्तम विवेचन केले आहे. वयाच्या ८२ व्या वर्षी कथासंग्रह प्रकाशित करणाऱ्या विद्याताईंचं त्यांची जिवलग मैत्रिण वृंदा पेंडसे हिने कौतुक केले आहे. तसेच विद्यार्थ्यांतर्फे श्री. अभय जुवेकर यांनी अभिनंदन केले. आकाशवाणीशी ताईचे असलेले ऋणानुबंध उमाताई दिक्षित यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

पहिल्या 'उकल' ह्या कथेत एकत्र कुटुंबाचे चित्रण सुरेख आहे. ह्यातील प्रमुख पात्र अप्पा गोखले यांच्या मनावर असलेले अनामिक भितीचे दडपण वाचकांची उत्सुकता वाढवते. पण शेवट होणारा उलगडा सुखकारक आहे.

'कोकिळेचे पोर' ही हळूहळू उलगडत रंगत जाणारी कथा आहे ज्यात कावळी वाढवत असलेल कोकिळेचे पोर, त्यावर बाईची नाखुषी, आजीचे भाष्य आणि त्यानंतर बाईच्या वागणुकीत झालेला बदल ह्यामुळे कथेचा शेवट विलोभनीय झाला आहे.

'पारख' ही कथा वर्तमानाशी नातं सांगणारी आहे. २२ तास विमान प्रवास, २ दिवस कॉन्फरन्स एवढ्या अवधीत घडलेल्या घटना वाचकांना गुंगवून ठेवतात.

'चुकामुक' ही एक हलकीफुलकी कथा, यात पात्रांना आलेले अनुभव पुढे जाण्याची प्रेरणा देतात.

'गोकुळीचा पाहुणा' ही कथा आपली मति गुंग करून टाकते. कुमारी मातेचे मुल वाढवताना जेव्हा १६ वर्षांनी; जेव्हा खरी आई त्या स्त्रिच्या नकळत मुल घेऊन जाते तेव्हां त्या यशोदेचा आक्रोश सुन्न करतो.

'सत्वपरीक्षा' ही कथा ही माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या दु:खदायक प्रसंगांना धैर्याने कसं सामोरं जायचं याची शिकवण देते.

'कौन्तेय' ह्या कथेमध्ये कुमारी मातेच्या स्वप्नांत येणारी राजस्त्री हिच्याशी संवाद साधते. तिने बाळाला कां त्यागलं ह्याचं कारण विचारते. कुंती माता आणि कथेतील स्त्री ह्यांचे संवाद स्वत:च्या बाळाप्रति असलेला दृष्टिकोन विशद करतात.

'कहाणी एका भिंतीची' यांत नाझी जर्मनीचा पराभव झाला त्यावेळी मित्रराष्ट्र इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका आणि पूर्वेकडून रशिया यांचा सहभाग होता. त्यामुळे जर्मनीचे (पूर्व आणि पश्चिम) असे विभाजन झाले आणि मधोमध भिंत बांधायचे ठरले. पण जर्मनांना निराशा आली. काहींना स्थलांतर करताना आलेले अनुभव हृदयद्रावक आहेत.




'तेजाची सावली' ह्यात कार्ल मार्क्स यांचा दरिद्री संसार चालवणारी जेनी आपल्या अपत्यांचा औषधाअभावी झालेला मृत्यू पाहणारी कार्ल मार्कर्सच्या तेजात लुप्त झाली.

स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळवून देणारी, त्यासाठी तुरुंगवास भोगणारी एमिलीन पॅखर्स्ट 'लढा' ह्या चरित्र कथेत भेटते. एमिली ब्राँटेचा परिचय तिच्या 'वुदरिंग हाईटस' ही प्रसिध्द कादंबरी लिहिणाऱ्या कवयित्री एमिली ब्रांटेच्या शोकात्म जीवनाचा परिचय 'मुक्ती हवी मज' या कथेत घडतो.

शांततेचे नोबेल पारितोषिक मिळवणारी जेन ॲडम्स तिच्या समाजसेवेच्या कार्यामुळे 'कर्मयोगिनी' ह्या कथेत भेटते.

गुलामांच्या मुक्ततेसाठी लढणारी हॅरियट बिचर 'मुक्तिदेवता' ह्या कथेत भेटते. ही कथा वाचकांना खिळवून ठेवते.


'झुंज' ह्या कथेत आपले इप्सित साध्य करण्यासाठी लढणारी 'इसाबेला गोदीन' जिद्दीने लढते.

'आकाशकन्या' ह्या कथेत पहिली स्त्री वैमानिक 'एमिलिया इयरहार्ट' हिची कहाणी मनाला स्पर्शुन जाते.

'दोन ध्रुवावर' ह्या कथेत दोन भिन्न स्तरातील आणि मेरी व अब्राहम लिंकन यांच्या जीवनातील प्रसंग चितारले आहेत.

विद्याताईंच्या सर्वच कथा पुन्हा पुन्हा वाचाव्या अशा आहेत. त्यातील प्रसंग, व्यक्तिरेखा आपल्याला गुंतवून ठेवतात. अवश्य वाचावा असा हा कथासंग्रह आहे. पुढील लेखनासाठी विद्याताईना शुभेच्छा !

**सौ. अनुराधा आपटे**
९००४६४६३६७






# नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला तेजपाल मार्ग उपाख्य वि. स. खांडेकर मार्ग

यावेळी आपण पूर्व पार्ल्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक मार्गाची ओळख करून घेऊया.

विलेपार्ले स्थानकाच्या पूर्व बाजूला, लोहमार्गाला समांतर असा एक रस्ता आहे. पार्ले स्थानकाच्या पूर्व बाजूला दक्षिणेस गॅलेक्सी अपार्टमेंट किंवा राजतारा अपार्टमेंट पासून ते पुढे पार्ले बिस्कीट फॅक्टरी पर्यंत जाणाऱ्या या रस्त्याचे मूळ नाव तेजपाल मार्ग असे होते. आता त्याचे नामकरण वि. स. खांडेकर मार्ग असे केले गेले आहे. या मार्गाच्या जन्माची कहाणी मोठी सुरस आहे.

शेठ गोकुळदास तेजपाल हे पूर्व विलेपार्ल्याचे एक प्रमुख शिल्पकार होते. १९०० नंतरच्या काळात जी काही मंडळी या उपनगरात राहावयास आली त्यामध्ये तेजपाल कुटुंबिय हे प्रामुख्याने होते. शेठ गोकुळदास तेजपाल यांनी विलेपार्ले स्थानकाजवळ बरीच भूमी विकत घेतली होती. अर्थात तेव्हा विलेपार्ले स्थानक बांधलेले नव्हते. त्याकाळी, या पूर्व बाजूला, रेल्वेला लागून रस्ता नव्हता. ही प्रवाशांची अडचण पाहून तेजपाल कुटुंबियांनी आपले रेल्वेकडील कंपाउंड मागे हटवून रस्त्यासाठी बरीच जमीन दिली. त्याची कृतज्ञता म्हणून या रस्त्याला तेजपाल रस्ता असे नाव दिले गेले. यावरून विषय निघाला म्हणून, तेजपाल कुटुंबियांचे विलेपार्ले रेल्वे स्थानक निर्मितीमधील योगदान सुद्धा थोडक्यात सांगतो. आत्ताचे दीनानाथ नाट्यगृह जेथे आहे त्या जागी शेठ तेजपाल साहेबांनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीला एक प्रासादतुल्य बंगला बांधावयास सुरुवात केली. त्यावेळी विलेपार्ले रेल्वे स्थानक नव्हते. बंगल्याच्या सामानाची ने आण करणे त्यामुळे फार जिकिरीचे व्हायचे . यावर उपाय म्हणून सामानाची ने आण करण्यासाठी तेजपाल कुटुंबियांनी सरकार दरबारी प्रयत्न करून आपली स्वत:ची जमीन आणि पैसे देऊन चक्क विलेपार्ले स्थानकच निर्माण करून घेतले!

तेजपाल शेठनी बांधलेला हा बंगला, मोर बंगला या नावाने प्रसिद्ध होता. या बंगल्याचा परिसर जवळजवळ चार एकराचा होता. अनेक दालने, कारंजी, संगमरवरी पुतळे, विस्तीर्ण उद्यान, विहीर व, विहिरीवर चक्क एक पवनचक्की, एवढेच नव्हे तर येथे गोशाळा आणि पोहण्याचा तलावही होता.

या बंगल्याच्या शिखरावर असलेल्या मोराच्या मूर्तीमुळे याचे नाव मोर बंगला असे पडले होते. पार्लेकरांच्या मनात घर करून राहिलेला हा बंगला कालांतराने विकला गेला आणि नंतर त्या जागेवर अग्रवाल मार्केट, महापालिका मंडई

पान १० वर








# संमोहन शास्त्र व उपचार

क्लिनिकल हिप्नोथेरपी किंवा संमोहन हे एक शास्त्र आहे. या शास्त्राचा आधार घेऊन मनमंथन या कौन्सिलिंग आणि हिप्नोथेरपी क्लिनिकमध्ये माणसाच्या मानसिक, मनोशारीरिक आणि शारीरिक आजारांवर विनाऔषध उपचार केले जातात. मनमंथन मध्ये समुपदेशन, क्लिनिकल हिप्नोथेरपी, ई एफ टी, विवाहपूर्व व विवाहानंतरचे समुपदेशन, मेंटल डिटॉक्सिफिकेशन, एन एल पी सेशन्स, म्युझिक थेरपी आणि रेमेडियल एज्युकेशन अशा विविध सर्विसेस उपलब्ध आहेत.

क्लिनिकल हिप्नोथेरपीद्वारे मानसिक आजार जसे काही तणाव, नैराश्य, निद्रानाश, चिंता, भिती , फोबिया आणि स्किझोफेनिया, ओ सी डी यांसारखे आजार प्राथमिक अवस्थेत असताना यांवर उपचार केले जातात. तसेच काही शारीरिक व्याधी उदाहरणार्थ -सांधेदुखी, अस्थमा किंवा कॅन्सर सारखे आजार ज्याचे नाव ऐकूनच पेशंटचे व त्याच्या नातेवाईकांचे मनोबल खचून जाते अशा रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना समुपदेशन आणि क्लिनिकल हिप्नोथेरपी, म्युझिक थेरपी याद्वारे मनोबल वाढवण्याकरता मदत केली जाते. सकारात्मकता वाढते, एक्सेप्टन्स वाढतो, इच्छाशक्ती वाढते, हळूहळू आत्मविश्वासही वाढतो आणि त्या उपचारांना पॉझिटिव्हली सामोरे गेल्याने त्यांच्या चालू असलेल्या मेडिकल ट्रीटमेंट्सचा खूप चांगला उपयोग होतो, रिझल्ट चांगले येतात. दैनंदिन जीवनातील त्यांचा नित्यक्रमही व्यवस्थित चालू राहतो. मन स्थिर आणि शांत राहते .

मनमंथन मध्ये येणाऱ्या व्यक्तीची हिस्टरी घेतली जाते, कौन्सिलिंग होते त्यानुसार थेरपीस ठरवल्या जातात .या उपचारांसाठी वयाची तशी अट नाही तरी वयाच्या बारा वर्षापासून कोणीही व्यक्ती जो सूचना ग्रहण करू शकतो किंवा समजू शकतो अशा व्यक्तीला क्लिनिकल हिप्नोथेरपी दिली जाते.

वयाच्या साडेतीन-चार वर्षापासूनच्या मुलांसाठी ॲक्टिव्हिटी बेस् कौन्सिलिंग सेशन्स ,गायडेड मेडिटेशन, श्लोक, मंत्रोच्चार, म्युझिक थेरपी, पालकांचे समुपदेशन अशा सर्विसेस उपलब्ध आहेत.

म्युझिक थेरपीद्वारे गर्भसंस्कार केले जातात. तसेच प्रसूतीनंतर आईचं आणि बाळाचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी म्युझिक थेरपी दिली जाते .

मनमंथन मध्ये येणाऱ्या व्यक्तीस थेरपी बरोबरच जर योग्य आहार तज्ञाची गरज असेल तर तशीही सोय मनमंथनमध्ये आहे .

मनमंथन मध्ये समुपदेशन किंवा थेरपीज घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची माहिती ही शंभर टक्के गोपनीय ठेवली जाते .

सतत चिडचिड होणे, राग येणे, झोपेची पॅटर्न चेंज होणे, एकलकोंडेपणा वाढणे, संवाद तुटत जाणे, सोशल लाइफ डिस्टर्ब होणे अशा प्रकारची लक्षणे जर तुमच्यामध्ये, तुमच्या फॅमिली मध्ये किंवा आजूबाजूला कोणत्या व्यक्तीमध्ये तुम्हाला आढळून आली तर नक्कीच मनमंथनशी संवाद साधावा.

**उमेश साने**
९१५२०१७१७०



# कलासक्त सूर

विलेपार्ले परिसरातील सुप्रसिद्ध गायिका, कलासक्त व्यक्तिमत्व, श्रीमती गौरी पाठारे.



गौरीताई पुण्याच्या. माहेरच्या गौरी दामले. आई-वडील दोघेही डॉक्टर. गायनॅकॉलॉजिस्ट. शाळा पुण्याची रेणुका स्वरूप. गाण्याचे संस्कार अगदी लहान वयात शाळेपासून मिळत गेले. शाळेच्या मैदानात सवाई गंधर्व महोत्सव व्हायचा. सर्वात शेवटी भीमसेनजींचं गाणं व्हायचं. त्याच मांडवात दुसऱ्या दिवशी शाळेचे गॅदरिंग होत असे. घरातली सगळी मंडळी गाण्याची आवड असणारी. त्यामुळे वर्षानुवर्ष सवाईला जाऊन बसायचं आणि ऐकायचं हा घरातील अलिखित नियम. गौरीताईंना अगदी सुरुवातीचं संगीत शिक्षण शाळेतील संगीत शिक्षक, भेंडीबाजार घराण्याचे श्री. शरद करमरकर यांच्याकडून मिळालं. ताईमधील गाण्याचे उपजत गुण त्यांना दिसले असावेत, त्यामुळे सलग पाच सहा वर्षं, शाळा भरायच्या आधी आणि नंतर, जेवढा वेळ मिळेल त्या वेळात गाणं शिकवत असत. वेगवेगळ्या स्पर्धांसाठी, कार्यक्रमांसाठी तयारी करून घेत. याच सुमारास किराणा घराण्याचे गायक पंडित गंगाधर पिंपळखरे गुरुजींकडेही शिकायला सुरुवात केली. ते त्यावेळी पुण्यात उत्तम गुरू म्हणून प्रसिद्ध होते. पुढे प्रसिद्ध झालेली संजीव अभ्यंकर, राहुल देशपांडे वगैरे मंडळी त्यांचेच विद्यार्थी. पिंपळखरे गुरुजी स्वरज्ञान, उत्तम बैठक आणि स्वरलगाव यासाठी प्रसिद्ध होते.

गौरीताईंच्या वाढदिवसाला त्यांना गाणं फार आवडतं म्हणून वडिलांनी छोटासा एक पेन्सिल सेलवर चालणारा ट्रांझिस्टर भेट दिला. त्या आशाताई आणि लताबाईंच्या प्रचंड भक्त होत्या. शास्त्रीय संगीत शिकायला सुरुवात केली तेव्हा सुरुवातीला डोक्यात असंच होतं की मी हे शिकणार आहे पण मला पार्श्वसंगीत गायिका व्हायचं आहे.

गौरीताईंची शैक्षणिक कारकीर्दही उत्तम होती. दहावीला चांगले मार्क्स होते. मॅथ, फिजिक्स आवडते विषय. त्यामुळे कॉम्प्युटर सॉफ्टवेअर मध्ये ग्रॅज्युएशन केलं. पुढे पोस्ट ग्रॅज्युएशनला ही ऍडमिशन मिळाली. पण या वेळेपर्यंत आता गाणं करायचं, तेही शास्त्रीय. हा पक्का निर्णय झाला होता. साधारण अकरा-बारावीत असताना पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे गाणं शिकायला जाऊ लागल्या. त्यांच्याकडे गेल्यावर आपल्याला शास्त्रीय संगीतच करायचं आहे हे जाणवलं. तोपर्यंतच्या काळात अगदी शाळेपासून वेगवेगळ्या सुगम संगीत, नाट्य संगीत वगैरे स्पर्धांमध्ये भाग घेऊन झाले होते. भरपूर बक्षीसं मिळवली होती. एक युरोप दूरही झाली होती. छोटे छोटे कार्यक्रम सुरू होते. त्यातून मनात भावना निर्माण होऊ लागली, स्टेज हेच माझं प्रमुख कार्यक्षेत्र आहे.

अभिषेकी बुवांकडे शास्त्रीय संगीत शिक्षण सुरू झालं. पण ते त्यांच्या पट्टीत.त्यामुळे थोडं वरच्या स्वरात, जमणार नाही तिथे थोडं खालच्या स्वरात असं. बुवांच्या गाण्याची वैशिष्ट्यं सांगताना गौरीताई म्हणतात, अभिषेकी बुवांच्या आयुष्यातली शेवटची सात वर्ष त्यांना ते गुरू म्हणून लाभले. त्या वेळेला ते थकले होते पण त्यांच्याकडे काव्याकडे पहाण्याची सौंदर्यदृष्टी होती. गाणं लयदार तर होतंच पण रुहदारीचंही होतं. रुहदारी म्हणजे शब्दातील भावोत्कटता. गौरीताईंवर त्यांचं गारुड होतं. 'एसो राम दीन हितकारी' हे तुलसीदासजींचं पद म्हणताना तोच राम शब्द, पण त्यांच्या शब्दात राम उभा राहिल्यासारखा वाटत असे. एका रागाचे सात-आठ ख्याल आणि पंधरा-वीस बंदिशी असे ते शिकवायचे. त्यामुळे एकच पृथ्वी वेगवेगळ्या कोनांतून पाहिली तर कशी दिसेल तसं रागाकडे बघणं व्हायचं. बुवांची तब्येत वर खाली व्हायला लागली त्यामुळे त्यांना

**गुरुकुल**



वाटलं आवाज घडण्याच्या काळात स्त्रीने स्त्रीकडे शिकावं. गौरी ताईंना पद्माताई.. पद्मा तळवलकर.. जयपूर-अत्रौली घराण्याच्या हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायिका, यांचं गाणं आवडत होतं. स्वतः बुवांनी पद्माताईंकडे शब्द टाकला आणि एकाच वेळी दोन्ही गुरूंकडे त्यांचं गाणं सुरू झालं. स्वतःच्या आवाजातला खरा 'सा', स्वच्छ 'आ'कार, खर्जातला टोन, स्वच्छ नैसर्गिक खुला अडाई सप्तकातला आवाज, कसा आला पाहिजे, हे ताईंकडे शिकायला मिळालं. तिथे एका रागातला एक ख्याल घेतला की तो सहा महिने चालायचा. एका ख्यालाच्या मुखड्यावर केवढा गायकीचा विचार होऊ शकतो, हे त्या ताईंकडे शिकल्या. साधारण सात-आठ वर्षे दोन्ही गुरुंकडे शिक्षण चालू होतं, पण ते आवाजाला पेलत नव्हतं. तेव्हा मधलं एक वर्ष दोन्ही गुरूंच्या संमतीने डागर साहेबांकडे गेल्या. धृपद नाही शिकल्या. धृपदाशी संबंधित गाण्याची जी अंगं आहेत, त्यांची गायकी, त्यांचे रियाज, थोडक्यात ग्रूमिंग ऑफ व्हॉईस शिकल्या. धृपद, २१ पिढ्या चालत आलेली भारतातील समृद्ध गायन शैली. शब्दशः अर्थ ध्रुव+पद, अर्थात जे नियमांमध्ये बांधले गेले आहे, जे अजुन अबाधित आहे. शरीर नावाचं यंत्र कसं वापरायचं, याचा शास्त्रीय विचार करून, शरीराला कुठेही त्रास होणार नाही, उलट श्वास, पचन संस्था आणि स्वरयंत्र यांचं संवर्धन कसं होईल, ताकद कशी वाढेल याचा विचार म्हणजे धृपद. एक प्रकारे आवाजाचं जिमच. सर्वांग सुंदर व्यायाम. गौरीताई धृपदाच्या रियाजामुळे वेगवेगळी घराणी हाताळू शकल्या.

बुवांच्या मृत्यूनंतर पुढची सात वर्षं त्या पद्माताईंकडे शिकल्या. नंतर लग्न, सांसारिक जबाबदाऱ्या, यांमुळे सात-आठ वर्षं कोणाकडे शिक्षण झालं नाही. पण आधी शिकलेलं गाणं ब्लॉटिंग पेपर प्रमाणे आत्मसात केलं होतं. ते मनात होतंच. याच काळात शिकवायला सुरुवात केली. हळूहळू कार्यक्रम सुरु झाले. त्या स्वतः विज्ञानाची विद्यार्थिनी असल्याने विज्ञाननिष्ठ आहेत. धृपदातील ज्या गोष्टी डागर साहेबांकडे अनुभवल्या होत्या, त्यावर मनन करून त्या आजच्या मुलांना कळेल अशा नवीन वैज्ञानिक भाषेत, आपल्या विद्यार्थिनींना समजावून सांगायला सुरुवात केली. त्याच सुमारास जाहिरात पाहिली, वेस्टर्न व्हॉइस कल्चर शिका, तुमचा आवाज नीट करा. वाटलं हे चुकीचं आहे. शास्त्रीय संगीत शिकणाऱ्यांनी शिकलं तर गळा खराब होईल. व्हॉइस कल्चर हा विषय वेगळा आहे. अजुन कोणी सोपा करून सांगितला नाहीये. या विषयावर आपण जे काम केलं आहे ते कोणी नाही केलेलं. तेव्हा व्हॉइस कल्चर वर दहा वर्कशॉप्स घेतली. स्वतःच्या यूट्यूब चॅनल वर दहा व्हिडीओज केले.

गौरीताई म्हणतात, त्यांच्या निर्णायक वयात करिअर संबंधी निर्णय आई-वडिलांनी त्यांच्यावरच सोडले. त्यावेळी गाणं आवडत होतं आणि शिक्षणही. त्यावेळची गोंधळलेली मन:स्थिती, आपण घेतलेला निर्णय योग्य आहे की अयोग्य, याबद्दलची आशंका हे त्यांचे स्वतःचे अनुभव होते. लेक ईश्वरी या मन:स्थितीतून जाताना त्यांनी तिला खंबीर साथ दिली. निर्णय घ्यायला मदत केली. तिची आणि तिच्या मित्रमंडळींची मानसिकता यावर विचारमंथन करून त्यांनी ते TEDEX साठी कोरोना काळात व्याख्यान दिलं, 'How To Be Divergent'. आजच्या काळात जग फास्ट झालं आहे. मुलांना करिअर संबंधित निर्णय फार लवकर घ्यावे लागत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर बऱ्यापैकी दडपण येतंय. त्या नादात चुका होतात. कोणी नैराश्याच्या गर्तेत जातात कोणी आत्महत्येचा प्रयत्न करतात. म्हणून मुलांना नैसर्गिक आणि स्वाभाविक जगा हे सांगायची वेळ आली आहे. त्याबरोबर तुम्ही भाषा, गणित, विज्ञान, संगीत, स्वैपाक, सगळं शिका. स्वतःला काय आवडतंय ते पाहा. एकच मार्ग न अवलंबता वेगवेगळ्या वाटा चोखाळून बघा, काळाप्रमाणे बदलत राहा असं त्या सांगतात.

गौरी ताईंना लहानपणापासून स्वयंपाकाची प्रचंड आवड आहे. आई हॉस्पिटलमध्ये गेली की स्वैपाकघराचा ताबा त्यांच्याकडे असे. स्वयंपाकातील हवे ते सगळे प्रकार करून पाहत असत. लग्नानंतर पाठारे प्रभू कुटुंबात आल्यावर इथली ही खाद्य संस्कृती आत्मसात केली. विशेषतः नॉनव्हेज प्रकार. लग्नानंतरही स्वयंपाक घराचा पूर्ण ताबा गौरीताईंकडे होता. बारा चौदा माणसांचा स्वैपाक लीलया करीत. पाठारे प्रभूंची, आहे त्यात घर कलात्मकतेने सजवणे, त्यांचा ड्रेसिंग सेन्स, दागिने, सणवार साजरे करायची पद्धती, या साऱ्या गोष्टी त्यांना मनापासून आवडल्या, त्यामुळे त्या आवडीने शिकत गेल्या. आजही त्यांच्या घरी वेगवेगळे पदार्थ केले जातात. मातृदिन, दिव्यांची अमावस्या, नवरात्र असे सारे उत्सव साजरे होतात. गाण्यातील मिळालेल्या ट्रॉफीज, देश-परदेशातून गोळा केलेली अँटिक्स कलापूर्ण दृष्टीने मांडलेली दिसतात. त्या म्हणतात हे सगळं केल्याने मन प्रसन्न राहातं. त्यामुळे तुमचं गाणं चांगलं होतं.

गौरीताई उत्तम कविता करतात. पण स्वान्तसुखाय. बालवयात बालकविता, तारुण्यात रोमॅण्टिक अशा त्या त्या वयानुसार कविता केल्या आहेत. त्या उत्तम ब्लॉगही लिहितात. ही भाषेची आवड आईकडून आली आहे. सुप्रसिद्ध लेखिका अनुराधा वैद्य आणि अंजली दिवेकर या त्यांच्या मावशी. दोघींनाही राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त आहेत. गौरीताईंची कन्या ईश्वरी आईप्रमाणेच उत्तम कविता करते. ब्लॉगर आहे. इंग्लिश मध्ये लिहिते. विलेपारल्यातील नामांकित शिल्पकार रावबहादूर गणपतराव म्हात्रे यांची ही खापरपणती. त्यामुळे तिच्याकडे कलेचा वारसा आला आहे. एन आय एफ टी मधून कम्युनिकेशन डिझाईन करते आहे. यात चित्रकला, भाषा, दोन्हीची जाण आवश्यक. कल्पनाशक्तीची जोड हवी आणि उत्तम स्मरणशक्ती. हे सारं तिच्यात आहे. स्टुडन्ट्स एक्सचेंज प्रोग्रॅम मधून न्यूयॉर्कला जाऊन आली आहे.

गौरीताई सध्या डॉ. अरुण द्रविड यांच्याकडे जयपूर-अत्रौली घराण्याचं गाणं शिकत आहेत. स्वतःही गाणं शिकवण्यात मग्न आहेत. देशापरदेशात त्यांच्या विद्यार्थिनी आहेत. ऑनलाईन ऑफलाईन क्लास चालू असतात. पुढे काय असं विचारताच त्या मिश्किल हसतात आणि म्हणतात मला स्वयंपाकाची प्रचंड आवड आहे आणि मी माझ्या स्वतःच्या रेसिपीजचं रेस्टॉरंट टाकणार आहे. त्यांच्या मनातील इच्छा सफल होवोत ही ईश्वरचरणी प्रार्थना ।।

**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

मनोरंजन विश्व

# अनन्या

आपल्याकडे एकच कथानक विविध माध्यमातून आपल्यासमोर येते, तेव्हा त्याबद्दलची उत्सुकता अधिक वाढत जाते. काही वर्षांपूर्वी 'अनन्या' ही एकांकिका सादर झाली आणि मग काही वर्षांनी 'अनन्या ' याच नावाचे नाटक आले. त्याच कथानकावर आधारित 'अनन्या' चित्रपट या जुलै महिन्यात आपल्या भेटीला येत आहे. आपल्या स्वप्नांची पूर्तता




करण्यासाठी धडपडणारी 'अनन्या'आहे. दुर्दैवाने एका अपघातात तिचे दोन्ही हात जातात . पण 'अनन्या' पुन्हा स्वत:च्या पायांवर उभी राहते. हा अनन्याचा प्रेरणादायी प्रवास 'अनन्या' चित्रपटातून मांडण्यात आला आहे. या चित्रपटात 'अनन्या' ही शीर्षक भूमिका साकारत आहे लोकप्रिय अभिनेत्री ऋता दुर्गुळे. ऋता म्हणते, "जेव्हा 'अनन्या' साठी माझी निवड झाल्याचं कळलं, तेव्हा प्रथम विश्वासच बसत नव्हता. 'अनन्या'च्या निमित्ताने माझे चित्रपटात पदार्पण होणार होते. पहिलाच चित्रपट एवढा मोठा, याहून आनंदाची गोष्ट कोणती असूच शकत नाही. या भूमिकेसाठी मला शारीरिक, मानसिक अशा सगळ्याच गोष्टींवर काम करावे लागले. प्रचंड मेहनत घ्यावी लागली." दिग्दर्शक प्रताप फड 'अनन्या'बदल म्हणतात, "गेल्या अनेक वर्षांपासून 'अनन्या' ला मी नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या समोर सादर केले".

"'अनन्या'चा हा स्फूर्तिदायी प्रवास प्रत्येकाने पाहावा, याकरता मी हा चित्रपट बनवण्याचा विचार केला. यामधील 'अनन्या'चा ध्येय साध्य करण्यासाठी आयुष्यासोबत चाललेला लढा प्रत्येकालाच जगण्यासाठी प्रेरणा देणारा आहे."

एव्हरेस्ट एंटरटेनमेंटचे संजय छाब्रिया म्हणतात, "मराठी कॉन्टेन्ट हा नेहमीच अर्थपूर्ण असतो. यात अनेक वेगवेगळे विषय हाताळले जातात. त्यामुळे असे चित्रपट जगभरात पोहोचावे, असे मला मनापासून वाटते."

निर्माते रवी जाधव म्हणतात, ''हे नाटक जेव्हा मी पहिले तेव्हाच या नाटकाचे चित्रपटात रूपांतर व्हावे, अशी माझी इच्छा होती आणि आता ती पूर्णत्वास येत आहे. मला आनंद आहे या चित्रपटाचा मी एक भाग आहे.''

एरहरेस्ट एंटरटेनमेंट, ड्रीमव्हीवर एंटरटेनमेंट आणि रवी जाधव निर्मित 'अनन्या' येत्या २२ जुलै रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन प्रताप फड यांनी केले असून ध्रुव दास, रवी जाधव आणि संजय छाब्रिया 'अनन्या'चे निर्माते आहेत.

# तमाशा लाईव्ह

एखाद्या चित्रपटात काही ना काहीतरी वेगळा प्रयोग होत असतो, असा एक मराठी सांगीतिक नजराणा घेऊन येत असलेला चित्रपट म्हणजे 'तमाशा लाईव्ह'. संजय जाधव दिग्दर्शित 'तमाशा लाईव्ह'चा सांगीतिक नजराणा येत्या १५ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत असून या चित्रपटाचे संगीत नुकतेच प्रदर्शित करण्यात आले.

हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत काही दिवसांपूर्वी 'चित्रपटाची नांदी' हे पहिले गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. त्या गाण्याला मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर बातमीची वारी, फड लागलाय, वाघ आला, लाथ घालणार, रंग लागला, कडकलक्ष्मी, गरमा गरम घ्या, झुंज लागली, वासुदेव, जाऊ कशी माघारी, जखम जहरी, गंमत गड्या अशा अनेक गाण्यांची सांगीतिक मैफल प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अमितराज व पंकज पडघन यांचे संगीत लाभलेल्या या गाण्यांचे बोल क्षितीज पटवर्धन यांचे आहेत. हे श्रवणीय संगीत चित्रपटाच्या कथेला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाणारे आहे. प्रत्येक पात्राची ओळख ही गाण्याच्या माध्यमातून होत असून अशा प्रकारचा प्रयोग मराठी चित्रपटात पहिल्यांदाच होत आहे. मुख्य म्हणजे सोनाली कुलकर्णी, सिद्धार्थ जाधव, सचित पाटील हे 'तमाशा लाईव्ह' चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच गायले आहेत. प्रेक्षकांना चित्रपटात काही विशिष्ट शैलीची गाणी ऐकायला मिळणार आहेत. रॅप, रोमँटिक असे गाण्यांचे विविध प्रकार यात असून नृत्य दिग्दर्शन उमेश जाधव यांनी केले आहे.

'तमाशा लाईव्ह'चे दिग्दर्शक संजय जाधव म्हणतात, "हल्ली मराठी चित्रपटांमध्ये नवनवे प्रयोग होत आहेत. असाच एक नाविन्यपूर्ण प्रयोग 'तमाशा लाईव्ह' मध्ये करण्यात आला आहे.




पारंपरिक संगीताला आधुनिकतेचा साज देण्यात आला आहे. त्यामुळे हे संगीत तरुणाईलाही भावणारे आहे." 'प्लॅनेट मराठी'चे प्रमुख, संस्थापक अक्षय बर्दापूरकर म्हणतात, '' संजय जाधव प्रेक्षकांसाठी नेहमीच काहीतरी हटके आणण्याचा प्रयत्न करत असतात.

त्यांच्या चित्रपटाचा विषय, संकल्पना नेहमीच वेगळी असते. हा चित्रपट म्हणजे संगीतप्रेमींसाठी पर्वणी आहे. कथेला पुढे घेऊन जाणारे हे संगीत आहे, हा नवीन प्रयोग प्रेक्षकांना आवडेल. "

प्लॅनेट मराठी व माऊली प्रॉडक्शन प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती अक्षय बर्दापूरकर यांनी केली आहे. सौम्या विळेकर, डॉ. मनीषा किशोर तोलमारे, समीर विष्णू केळकर, अजय वासुदेव उपर्वात सहनिर्मित 'तमाशा लाईव्ह'ची कथा मनीष कदम यांनी लिहिली असून संवाद अरविंद जगताप यांचे आहेत.


**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

पान ५ वरून

## सायबेरियाची राजकन्या

आणलं. सर्गी आणि मारियाला जेंव्हा स्वत:च घर बांधायची परवानगी मिळाली, तेंव्हा तिचं घर गायक, वादक, संगीतकारांचं पूर्वेकडील केंद्रस्थान बनलं. इर्कुतस्कच्या सांस्कृतिक परिवर्तनाची सुरुवात इथूनच झाली.

मारियाच्या ह्या घराचा आज म्युझियम झाला आहे. आणि नियमितपणे संगीताच्या मेहफिली घरात सादर करण्याची मारियाने सुरु केलेली प्रथा १०० वर्षांनंतरही आजतागायत तिथे अव्याहत चालू आहे. तिथे बसून पाश्चिमात्य शास्त्रीय संगीताचा जलसा ऐकणे हा एक अविस्मरणीय अनुभव होता. ह्या साध्यासुध्या घराच्या **(दुसरा फोटो)** बाजूने तुम्ही गेलात तर तुम्ही पुन्हा वळूनसुद्धा त्याच्याकडे पाहणार नाही.





तीन आठवड्यांच्या रशियाच्या प्रवासात मी अनेक भव्य, नेत्रदीपक इमारती पाहिल्या - उदाहरणार्थ मॉस्कोतील सेंट बेसीलचं कॅथीड्रल (तिसरा फोटो), कझान मधील 'मंगल कार्यालय'जिथे १०० लग्न समारंभ एकाच





वेळी होऊ शकतात (चौथा फोटो), मॉस्को युनिव्हर्सिटी (पाचवा फोटो), सेंट पीटर्सबर्ग मधील चर्च ऑफ द सेव्हियर (सहावा फोटो) आणि अगणित कितीतरी.

पण मारियाच्या ह्या साध्या घराएव्हढं महत्वाचं आणि हृदयाला भिडणारं त्यात काहीच नव्हतं.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

## गुरूपौर्णिमेनिमित्त मा. ल. भागवत शाळेतील मराठी विषयाच्या शिक्षकांना वंदन


दिनेश वाघमारे


मनिषा वरखंडकर


शर्मिला राणे


वृशाली सातव

पान ७ वरून

## नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला तेजपाल मार्ग उपाख्य वि. स. खांडेकर मार्ग

आणि दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह उभे राहिले.

या मार्गासाठी रामकृष्ण हॉटेलपासून उत्तर बाजूला तेजपाल शेठनी जागा दिली तर खाली दक्षिण बाजूला त्या काळचे अर्ध्यातील दुसरे एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व डॉक्टर कांबळी यांनी सुद्धा आपली बरीच जागा दिली होती. या दोन दानशूर व्यक्तींच्या औदार्यामुळे त्याकाळी पार्ले गावाच्या दक्षिण उत्तर भागातील वस्तीत जाण्याची लोकांसाठी मोठीच सोय झाली.

पूर्वी दक्षिणेकडील रेल्वे क्रॉसिंगपर्यंतच्या रस्त्याला तेजपाल मार्ग असे म्हटले जायचे. नंतर गॅलेक्सी अपार्टमेंटच्या पुढील बाजूच्या रस्त्याला आझाद मार्ग आणि नंतर आता मकरंद घाणेकर मार्ग म्हणून ओळखले जाते.

तेजपाल मार्ग ऐतिहासिक मार्ग असे आम्ही म्हटले, त्याला कारणही तसेच आहे. तेजपाल कुटुंबियांचा स्वातंत्र्य चळवळीमध्ये फार मोठा सहभाग होता. त्याकाळी आणि अगदी स्वातंत्र्योत्तर काळात सुद्धा मोठमोठ्या नेत्यांच्या बऱ्याच सभा तेजपाल मार्गावरील तेजपाल साहेबांच्या मोर बंगल्यात व्हायच्या. सुभाष चंद्र बोस, काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव, साने गुरुजी, आचार्य कृपलानी आणि इतर अनेक महान व्यक्ती या बंगल्यात सभांसाठी येऊन गेल्या आहेत. १९१६च्या आसपास







विलेपार्ल्यातील अनेक सार्वजनिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी पार्ले रेसिडेंट असोसिएशन ही संस्था याच बंगल्यात स्थापन करण्यात आली होती.

पार्ल्यातील त्याकाळचे एक प्रसिद्ध समाजसेवक डॉक्टर पुरुषोत्तम गजानन वर्तक हे याच तेजपाल मार्गावरील एका इमारतीमध्ये राहायचे. पार्ले टिळक विद्यालय आणि इतर अनेक संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या पदावर काम केले होते.

त्याकाळचे घड्याळ दुरुस्तीचे एकमेव दुकान, श्री सदाशिव गोपाळ जोशी याच तेजपाल रस्त्यावर चालवत असत.

तेजपाल मार्गावरची दोन हॉटेल्स पार्लेकरांच्या विशेष जिव्हाळ्याची आहेत. एक म्हणजे नेहरू रोड आणि तेजपाल रोड यांच्या मीलनस्थानी असलेले हॉटेल रामकृष्ण आणि दुसरे म्हणजे जोगळेकरांचे हॉटेल जीवन. हॉटेल रामकृष्ण हे १९४३ मध्ये रामकृष्ण भुवन या नावाने कॉफी हाऊस म्हणून सुरू झाले होते.

तेजपाल मार्गावर पश्चिम बाजूला रेल्वे स्टेशन आहे. स्टेशनच्या जवळजवळ समोरील बाजूसच दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह पार्लेकरांचा नाट्य प्रेमाचा वारसा अंगाखांद्यावर बाळगत दिमाखाने उभे आहे.



आणखी एक ऐतिहासिक वास्तू या मार्गाच्या उत्तर टोकावर आहे आणि ती म्हणजे मुंबई महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्तानमध्ये गेली कित्येक वर्षे प्रसिद्ध असलेली पार्ले बिस्कीटे






बनवण्याची फॅक्टरी! या पार्ले बिस्किटांमुळे पार्ले गावाचे नाव संपूर्ण हिंदुस्तानभर पसरले. या फॅक्टरीचे मालक असलेल्या चौहान कुटुंबियांचा बंगला सुद्धा तेजपाल मार्गावरच आहे. आता ही फॅक्टरी जरी बंद असली तरी वास्तु अजून तरी उभी आहे. अगदी अलीकडे म्हणजे १५ वर्षांपूर्वीपर्यंत या फॅक्टरीत बनणाऱ्या बिस्किटांचा एक सुंदर सुवास पार्ले परिसरात दरवळत राहायचा. आता तो वास जरी पसरत नसला तरी त्या बिस्किटांचा स्मृतिगंध पार्लेकरांच्या मनात अजूनही ताजा आहे.

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

